



परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
संपादक - मोहन व्हावळे
https://www.parlisangharshneta.in 9881265102
बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 168 | मंगळवार दि. 01 जुलै 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2₹ | RNI: MAHMAR/2016/67060

## बीडमधील विद्यार्थिनीच्या लैंगिक छळाप्रकरणी आरोपींवर कडक कार्यवाही करा

### - ना. पंकजाताई मुंडेंच्या एसपींना सूचना



बीड।दिनांक 30।

शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलात कोचिंग क्लास मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीचा लैंगिक छळ करणा-या आरोपींविरुद्ध कठोर आणि कडक कार्यवाही करा अशा सूचना पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी एसपींना केल्या आहेत.

या घटनेविषयी ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी नुकतीच घटनेची माहिती घेवून याविषयी सूचना केल्या.उमाकिरण शैक्षणिक संकुलातील शिक्षक प्रशांत खटावकर आणि विजय पवार या दोघांनी एका सतरा वर्षीय विद्यार्थिनीचे गेल्या एक वर्षापासून लैंगिक शोषण केले, याविरुध्द सदर विद्यार्थिनीने शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल केल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी लगेच पोलिस अधीक्षकांना फोन करुन आरोपींना तात्काळ अटक करण्याची सूचना केली होती. मुळातच ही घटना अतिशय संतापजनक आणि जिल्ह्याला काळीमा फासणारी आहे, शिक्षकांचे हे कृत्य गंभीर स्वरुपाचे आहे, त्यांना ताब्यात घेतले असले तरी ते सुटले जावू

## पर्यावरण मंत्री ना. पंकजा मुंडे यांची ईव्ही कारमधून विधानभवनात एन्ट्री

### » प्रदुषणमुक्त महाराष्ट्रासाठी दिला प्रतिकात्मक संदेश

मुंबई।दिनांक 30।

विधीमंडळ अधिवेशनाच्या आजच्या पहिल्याच दिवशी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची विधानभवनात इलेक्ट्रिक वाहनाने धमाकेदार एन्ट्री झाली. प्रदूषण मुक्त महाराष्ट्रासाठी प्रतिकात्मक संदेश देत त्यांनी इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.



पर्यावरण मंत्री या नात्याने दैनंदिन प्रवासासाठी इलेक्ट्रिक वाहन वापरण्याचा मनोदय व्यक्त करत तशा सूचना त्यांनी काही दिवसांपूर्वी विभागाला दिल्या होत्या, त्यानुसार विभागाकडून महिंद्रा कंपनीची इलेक्ट्रिक कार त्यांना आज उपलब्ध झाली. आजपासूनच विधीमंडळाचे अधिवेशन सुरु झाले असल्याने याच ईव्ही कारमधून त्यांनी रामटेक शासकीय निवासस्थान ते विधानभवन असा प्रवास केला, त्यांचेसमवेत नगर पान 3 वर

## धनंजय मुंडे यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट

### बीड अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एस आय टी स्थापन करण्याची पत्राद्वारे मागणी



मुंबई (दि. 30) - राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज बीड शहरात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची विधानभवन मुंबई येथे भेट घेऊन या प्रकरणात बीड जिल्हा बाहेर सेवेत असलेल्या एका अनुभवी आय पी एस दर्जाच्या महिला पोलिस अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (SIT) स्थापन करून स्वतंत्र चौकशी करून न्याय मिळवून देण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे.

बीड शहरातील उमाकिरण संकुलात आरोपी विजय पवार व प्रशांत खटोकर यांनी अल्पवयीन मुलीवर केलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी दोन्ही आरोपींना पोलिसांनी वैद्यकीय रजेवर व अन्य तालुक्यात नियुक्त असलेल्या अधिकाऱ्यामार्फत नाट्यमय रित्या अटक केली असून, या प्रकरणात सुरु असलेला तपास समाधानकारक नाही, तसेच याप्रमाणे अनेक मुलींचे लैंगिक शोषण या नराधमांनी केले असून त्यांना असलेल्या स्थानिक राजकीय पाठबळमुळे इतर पीडित मुली तक्रार द्यायला धजावत नाहीत, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दबावातून या आरोपींना वाचवण्याचे काम केले जाऊ शकते, त्यामुळे या प्रकरणात पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी एका महिला आय पी एस अधिकारी यांच्यामार्फत स्वतंत्र निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

या प्रकरणी तपासात डिजिटल पुरावे गोळा पान 3 वर




## आज प्रा.टी.पी.मुंडे यांच्या शुभहस्ते जिगा दाबेली अँड पिझ्झा कॅफेचा शुभारंभ!

### सिने अभिनेत्री गौतमी पाटील आणि मिस युनिव्हर्स रूपल मेहता यांची प्रमुख उपस्थिती!



परळी वैजनाथ प्रतिनिधी परळीतील खवयेकरांसाठी नव्याने सुरु होत असलेल्या जिगा दाबेली अँड पिझ्झा कॅफेचे उद्घाटन शुभारंभ ओबीसी नेते प्रा.टी.पी. मुंडे सर यांच्या शुभहस्ते आज दिनांक 1 जुलै वार मंगळवार रोजी सायंकाळी 4 वाजता संपन्न होत असून या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून सिने अभिनेत्री गौतमी पाटील आणि मिस युनिव्हर्स रूपल मेहता, वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव राजेशजी देशमुख , डी.पी. आय महिला अध्यक्ष बीड श्रीमती उषाताई चव्हाण, महेश बँकेचे चेअरमन ओमप्रकाशजी सारडा यांच्या विशेष उपस्थितीमध्ये भव्य दिव्य असा सोहळा संपन्न होत आहे.

मराठवाडा ग्रामीण बँकेच्या शेजारी हाडबे हॉस्पिटल रोड येथे हा शुभारंभ सोहळा संपन्न होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिगा दाबेली अँड पिझ्झा सेंटरच्या संचालिका श्रीमती शिला माणिक राठोड, जिगा दाबेली अँड पिझ्झा सेंटरचे संस्थापक राजेंद्र कुमार शंकर सुतार, श्रीमती राजश्री राजेंद्र कुमार सुतार, शिवाजीराव राठोड, विठ्ठलराव घोडके, सिने अभिनेते व निर्माते प्रशांतजी तोतला यांचीही उपस्थिती राहणार आहे. परळीतील सर्व खवयगिरींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन कार्यक्रमाचे पान 3 वर

## जिथं बाळासाहेबांचं पहिलं भाषण, तिथंच राज-उद्धव ठाकरे एकत्र

### मुंबईच्या विजयी मेळाव्यात एल्गार!



गेल्या अनेक दिवसांपासूव मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या युतीची चर्चा चालू आहे. विशेष म्हणजे आमच्या दोघांत थेट जरी नसली तरी एकत्र येण्याबाबत चर्चा चालू आहे, असे ठाकरे यांनी सांगितले आहे. दरम्यान, या युतीआधी दोन्ही ठाकरे बंधू 5 जुलै रोजी विजयी मेळाव्याला मुंबईत एकत्र येणार पान 3 वर

## भाजपा आ.बबनराव लोणीकरांनी शेतकरी विरोधात केलेल्या वक्तव्याचा परळी काँग्रेसच्या वितीने प्रतिमेला जोडे मारो आंदोलन

### बेताल वक्तव्य करणाऱ्या लोणीकरावर गुन्हा दाखल करण्यासाठी तहसीलदारांना दिले निवेदन




परळी प्रतिनिधी भाजपा आ.बबनराव लोणीकरांनी शेतकरी विरोधात केलेल्या बेताल वक्तव्याच्या निषेधार्थ परळी काँग्रेसच्या वितीने लोणीकरांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करत परळी तहसीलदार यांना निवेदन शहराध्यक्ष बहादुरभाई यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

परळी तहसीलदार यांना काँग्रेस च्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,भारतीय जनता पार्टीचे आमदार बबनराव लोणीकर यांनी एका कार्यक्रमात राज्यातील शेतकऱ्यांबद्दल अतिशय निंदनीय असे वक्तव्य केले. त्यांच्या वक्तव्यातून त्यांची व त्यांच्या पक्षाची शेतकऱ्यांबद्दलची मानसिकता लक्षात येते. तुझ्या बापाला पेरणीचे पैसे मोदींनीच दिले, तुझ्या अंगावरचे कपडे, तुझ्या पायातील पान 3 वर






# संपादकीय

## हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक


वसंतराव नाईक यांनी कायदयाचे शिक्षण पूर्ण करुन पुसद येथे वकीलीस सुरुवात केली. वकीलीत त्यांचा जम बसू लागला. याच काळात ते सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होवू लागले. 1946 ते 1952 या काळात त्यांनी पुसदचे नगराध्यक्ष पद भुषविले. सन 1951-52 मध्ये तत्कालीन मध्य प्रांताच्या सहकारी बँकेचे संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. 1952 मध्ये तत्कालीन मध्य प्रांताच्या विधानसभेवर ते निवडून आले व पंडीत रविशंकर शुक्ल यांच्या मंत्रीमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री झाले. 1956 ला राज्य पुनर्रचनेनंतर निर्माण झालेल्या मुंबई राज्याच्या यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात ते 1957 मध्ये कृषिमंत्री झाले. सन 1960 मध्ये मराठी भाषिकांच्या महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. यावेळी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी वसंतराव नाईक यांना महसूल या अतिशय महत्वाच्या खात्याची जबाबदारी सोपवली. महसूल मंत्री असतानाच सतेच्या विकेंद्रीकरणसाठी नेमलेल्या पंचायत राज समितीचे ते अध्यक्ष होते. या समितीने त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची शिफारस केली व त्यानुसार महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 हा कायदा विधीमंडळाने पारीत केला व राज्यात जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अस्तित्वात आल्या. म्हणूनच राज्यातील पंचायत राज व्यवस्थेचे त्यांना जनक असे संबोधले जाते. 1962 मध्ये यशवंतराव चव्हाण केंद्रात संरक्षण मंत्री बनल्याने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी मारोतराव कन्नमवार विराजमान झाले. यावेळीही वसंतराव नाईक यांच्यावर महसूल खात्याचीच जाबाबदारी देण्यात आली. मुख्यमंत्री म्हणून मारोतराव कन्नमवार यांची कारकीर्द अल्पजीवी ठरली, कारण 1963 मध्ये त्यांचा अकाली मृत्यू झाला. त्यानंतर 5 डिसेंबर 1963 रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी वसंतराव नाईक विराजमान झाले. त्यांनी हे पद 20 फेब्रुवारी 1975 पर्यंत म्हणजे जवळपास एक तप एवढ्या प्रदीर्घ काळासाठी यशस्वीरित्या सांभाळले. 1977 मध्ये आणीबाणी नंतर झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत ते वाशिम मतदारसंघातून निवडून आले होते. 18 ऑगस्ट 1979 रोजी त्यांना देवाज्ञा झाली.

वसंतराव नाईक यांचा जन्म 1 जुलै 1913 रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली या गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव फुलसिंग तर आईचे नाव होनूबाई असे होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण गहुली व आसपासच्या खेड्यात तर माध्यमिक शिक्षण विठोली व अमरावती येथे झाले. 1938 मध्ये नागपूरच्या मॉरीस कॉलेजमधून त्यांनी बी.ए.ची पदवी मिळवली. त्यानंतर 1940 ला त्यांनी एल.एल.बी.ची पदवी मिळवली. 1941 ला त्यांनी आंतरजातीय विवाह केला. त्यांच्या पत्नीचे नाव वत्सलाबाई असे होते.

वसंतराव नाईक यांनी आपल्या मंत्री व मुख्यमंत्री पदाच्या काळात राज्याच्या विकासाच्या अनेक योजना राबविल्या. राज्याचा विकास करावयाचा असेल तर पायाभुत सुविधा निर्माण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी हेरले व त्या उभारण्यावर त्यांनी विशेष भर दिला. शेती हा त्यांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय. कृषिमंत्री असतांना त्यांनी जपानचा दौरा केला होता. जपानी भात शेती पाहून ते खुप प्रभावित झाले. त्यांनी ते तंत्रज्ञान राज्याच्या शेतीत आणले. त्यासाठी आयोजित प्रात्यक्षिकांना ते आपल्या व्यस्त दिनचर्यातून वेळ काढून आवर्जुन उपस्थित राहत असत. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीमध्ये राज्यात कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यासाठी कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भासाठी चार स्वतंत्र कृषि विद्यापीठ निर्माण झाली. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेती करण्यासाठी बियाणे, खते, किटकनाशके, सुधारित अवजारे यांचा पुरवठा करण्यासाठी त्यांनी महाबीज, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यासारख्या महामंडळाची निर्मीती केली. आपला देश व राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांनी अतोनात परिश्रम घेतले. संकरीत बियाणांचा वापर केल्याशिवाय अन्नधान्यात स्वयंपूर्णता गाठणे कठीण आहे हे त्यांनी ओळखले होते म्हणून ते संकरीत बियाण्याच्या वापराचा हिरहिरीने पुरस्कार करत असत. सन 1972 मध्ये देशात अभुतपूर्व असा दुष्काळ पडला परंतू याही कठीण परिस्थितीमध्ये राज्यातील जनतेला त्यांनी भक्कम आधार दिला. लोकांच्या हाताला काम मिळावे यासाठी अनेक सरकारी कामे सुरु केली. जलसंधारणाची, पाझर तलावाची अनेक कामे हाती घेतली. त्यांच्या खंबीर नेतृत्वाखाली राज्याने दुष्काळाचा समर्थपणे मुकाबला केला. मागेल त्याला काम देणारी रोजगार हमी योजना त्यांच्याच कारकिर्दीत सुरु झाली. आता ही योजना देशभर राबवली जात आहे, यातच त्यांचे द्रष्टेपण आपणास दिसून येते. त्यामुळेच त्यांना राज्यातील हरितक्रांतीचे जनक असे संबोधले जाते. त्यांच्या या महान कार्याची नोंद घेत त्यांचा 1 जुलै हा जन्म दिन कृषि दिन म्हणून राज्यभर साजरा केला जातो. अशा या हरितक्रांती व्यक्तीमत्वास त्यांच्या जयंती दिनी विनम्र अभिवादन !

# वसंतराव नाईक: शेतकऱ्यांचा जाणता राजा

**डॉ. भारत कऱ्हाड**



महाराष्ट्राच्या राजकारणात, विशेषतः ग्रामीण आणि कृषी विकासाच्या क्षेत्रात अजरामर नाव कोरून ठेवणाऱ्या व्यक्तिमत्वांपैकी वसंतराव नाईक हे अग्रगण्य नाव होय. त्यांचा जन्म 1 जुलै 1913 रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद जवळील गहुली या छोट्याशा खेड्यात झाला. एका सधन शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या वसंतराव नाईक यांना बालपणापासून शेतीशी आत्मीयता होती. शेती, माती आणि शेतकरी यांच्या समस्या त्यांनी फार जवळून पाहिल्या. याच पार्श्वभूमीमुळे त्यांचे पुढील जीवन शेती, शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी झिजवले गेले.

वसंतराव नाईक यांनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी.ए. ही पदवी घेतली आणि नंतर एल.एल.बी. पदवी मिळवली. डेल कार्नेगी यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. महाविद्यालयात असताना त्यांची ओळख वत्सलाताई घाटे यांच्याशी झाली आणि पुढे त्यांनी आंतरजातीय विवाह केला. त्यांच्या वकीलीच्या कारकिर्दीची सुरुवात पुसद येथे झाली. गोरगरीब, शेतकरी आणि आदिवासी जनतेसाठी त्यांनी वकिली केली. त्यामुळे समाजात त्यांची ओळख 'शेतकऱ्यांचा वकील' म्हणून निर्माण झाली.

राजकारणात त्यांचा प्रवेश 1946 साली कॉंग्रेस पक्षातून झाला. त्यांनी पुसद कृषी मंडळाचे अध्यक्ष, पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष, हरिजन वसतिगृह आणि राष्ट्रीय वसतिगृहाचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि समाजाशी असलेल्या मजबूत नात्यामुळे ते 1952 मध्ये मध्य प्रदेश राज्यात महसूल उपमंत्री झाले. 1957 मध्ये कृषिमंत्री आणि 1960 मध्ये स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महसूल मंत्री म्हणून जबाबदारी पार पाडली.

1963 साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या निधनानंतर वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. सलग 12 वर्षे मुख्यमंत्री राहण्याचा अभूतपूर्व विक्रम त्यांनी केला. त्यांच्या काळात महाराष्ट्राच्या विकासाचे मजबूत पायाभरणीचे काम झाले. महाराष्ट्र धान्य उत्पादनात स्वयंपूर्ण व्हावा, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. "दोन वर्षात महाराष्ट्र धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही, तर मी स्वतः फाशी जाईन" अशी त्यांनी घेतलेली जाहीर जबाबदारी त्यांच्या आत्मविश्वासाचे प्रतिक होती. शेती, सिंचन, पाझर तलाव, वसंत बंधारे या योजनांनी ग्रामीण भागात जलसंधारणाला चालना दिली.

वसंतराव नाईक यांनी शिक्षण, सहकार, औद्योगिकीकरण, सिंचन आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. रोजगार हमी योजना ही भारतातील पहिली रोजगार हमी योजना त्यांनी सुरू केली. महाराष्ट्रात औद्योगिकीकरणाचे जाळे पसरवण्यासाठी त्यांनी एमआयडीसीच्या माध्यमातून नवे औद्योगिक क्षेत्र विकसित केली. कोराडी, पारस, खापरखेडा आणि परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रांची निर्मिती झाली. नवी मुंबई आणि नवे औरंगाबाद या महानगरांची संकल्पना साकार झाली.

कृषी क्षेत्रात त्यांनी मोठी क्रांती घडवून आणली. महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठांची स्थापना हे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित होते. कृषी संशोधनाला चालना देण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) स्थापन केले. कापूस एकाधिकार योजना राबवून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नावर हक्क मिळवून दिला. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाची (बालभारती) स्थापना करून शालेय शिक्षणात सुधारणा केली. त्यांनी मराठी भाषेला 1964 साली राज्यभाषेचा दर्जा मिळवून दिला.

वसंतराव नाईक हे केवळ राज्यपुरते सीमित राहिले नाहीत. त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर जपान, युगोस्लाव्हिया, अमेरिका, चीन, सिंगापूर या देशांचा कृषी अभ्यास दौरा केला आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान महाराष्ट्रात आणले. त्यांनी हरित क्रांती, श्वेत क्रांती आणि कृषी औद्योगिकीकरणाला चालना दिली.

1975 साली मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांनी संपूर्ण जीवन सामाजिक कार्यासाठी वाहून घेतले. 1977 साली ते लोकसभेसाठी निवडून आले. त्यांनी शेवटपर्यंत शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यरत राहणे कधीही सोडले नाही.

वसंतराव नाईक यांच्या स्मरणार्थ 1 जुलै हा दिवस 'कृषीदिन' म्हणून साजरा केला जातो. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली 1989 साली हा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे, वसंतराव नाईक यांची जयंती फक्त कार्यालयातच नाही तर थेट शेतकऱ्यांच्या बांधावर साजरी केली जाते. 'थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' हा उपक्रम एकनाथराव पवार यांनी सुरु केला. आजही गाव, तांडा, पाल, शहर आणि शेतशिवारात हा दिवस अत्यंत श्रद्धेने साजरा होतो.

वसंतराव नाईक यांच्या जीवनावर आधारित 'महानायक वसंत तू' हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला असून, चिन्मय मांडलेकर यांनी त्यांची भूमिका साकारली आहे. त्यांच्यावर मधुकर भावे यांनी 'महानायक', मधू मंगेश कर्णिक यांनी 'दूत पर्जन्याचा' आणि रासबिहारी सिंग बैस यांनी 'वसंतराव नाईक यांचे जीवनचरित्र' हे ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचे निवडक भाषणांचे संकलन दिनेश देसाई यांनी केले आहे. 'तुला वसंत म्हणू की महासंत म्हणू मी' हे लोकप्रिय वसंतगीत एकनाथराव पवार यांनी लिहिले आहे.

18 ऑगस्ट 1979 रोजी सिंगापूर येथे वसंतराव नाईक यांचे निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुतणे सुधाकरराव नाईक हेही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. अनेक तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, 1970 च्या दशकात वसंतराव नाईक यांनी शिवसेनेला अप्रत्यक्षपणे हातभार लावला, जेव्हा मुंबईतील कम्युनिस्ट नेतृत्वाच्या कामगार संघटनांना तोडण्यासाठी शिवसेनेला पर्याय म्हणून पुढे आणले गेले.

वसंतराव नाईक हे नाव केवळ व्यक्तीपुरते मर्यादित नव्हते, तर एक विचारधारा, एक चळवळ होती. त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासाला वेग दिला. त्यांच्या कार्यामुळे त्यांना 'शेतकऱ्यांचा जाणता राजा', 'हरितयोद्धा' आणि 'महानायक' अशी उपाधी मिळाली. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी त्यांना 'भारत मातेचे थोर सुपुत्र' असे गौरविले.

आजच्या पिढीसाठी वसंतराव नाईक हे एक प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या कार्याची आठवण आजही होते आणि त्यांची लोकाभिमुख विचारसरणी आजही समाजात प्रभावीपणे जिवंत आहे. त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने वसंतराव नाईक साहेबांना हीच खरी आदरांजली!

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# पहिले शेतकरी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचा राजा !

## (1 जुलै : वसंतराव नाईक जयंती : महाराष्ट्र कृषि दिन.)

या दिवशी कृषीसंस्कृतीचे संस्मरण करून कृषीसंस्कृतीच्या समृद्धीसाठी संकल्प केल्या जाते. हा पर्व थेट बांधावर, शेत शिवारातही साजरा होत असून यात शेतकरी सन्मान, समुपदेशन, फळझाडांची लागवड व शेतकऱ्यांचे भाग्यविधाते महानायक वसंतराव नाईकांना आदरांजली अशा विविध स्वरुपात साजरा केला जातो. थेट शेत बांधावर शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी, शेतकऱ्यांना आत्महत्यापासून परावृत्त करून आत्मबळ मिळावे. आधुनिक शेती तंत्राचा जागर व्हावा, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा व शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी, हाच सार्थ उद्देश. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा बोधप्रद संकलित लेख कृषिबांधवांच्या सेवेत.... संपादक.

आज 1 जुलै रोजी भारत या कृषीप्रधान देशातला कृषी आणि कृषकांचा- शेतकऱ्यांचा पावन पर्व आहे. कृषि दिन हा कृषीप्रधान देशाचा एक पावन पर्व मानला जातो. त्यामुळे कृषी दिनाला विशेष असे महत्त्व आहे. कृषी दिन 1 जुलै रोजी हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त शासन स्तरावर साजरा केला जातो. याच दिवशी अन्नदाता शेतकऱ्यांचा सर्वत्र सन्मान केला जातो. तसेच शेती आणि मातीवर निस्सीम भक्ती असणारे जागतिक ख्यातीचे कृषीतज्ज्ञ व प्रगतशील शेतकरी महानायक वसंतराव नाईक यांना आदरांजली अर्पण केल्या जाते. महानायक वसंतराव नाईक यांचे लोकशाही सक्षमीकरण, ग्रामीण विकास व विशेषतः कृषी औद्योगिक क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानामुळे त्यांना महानायक, शेतकऱ्यांचा जाणता राजा म्हणूनही संबोधले जाते. भारताचे राष्ट्रपती, भारतरत्न डॉ.प्रणव मुखर्जी यांनी "वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहे." या शब्दात नाईकांचे गौरव केले. तसेच थेट शेतकऱ्यांच्या बांधावर मोहिमेचे प्रवर्तक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी "आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत" या शब्दात महानायक वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे.

भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन 1989मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केले. तेव्हापासून एक जुलैला शासकीय स्तरावर सर्व कार्यालयात कृषीदिन साजरा होत आहे. तर दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे शेतकऱ्यांचे कैवारी, शेतीवर निस्सीम भक्ती असणारे क्रांतिकारी कृषीसंत वसंतराव नाईक नेहमी म्हणायचे कि, "मी मुख्यमंत्र्यांच्या सिंहासनावर देहाने जरी असलो तरीदेखील माझे चित्त मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर असते." हा वसंतविचार लक्षात घेता शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व शेतकऱ्याना आत्मबळ देण्यासाठी प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची अभिनव संकल्पना रुजवली. तेंव्हापासून कृषीदिवस हा थेट बांधावर शेत शिवारातही साजरा करण्यास सुरुवात झाली. कार्यालयात साजरा होणारा कृषीदिवस आज थेट शेत बांधावरही साजरा करण्याची प्रथा रुढ झाली. कृषी दिन शासकीय कार्यालयीन स्तरावर ते थेट शेत बांधावर साजरा करण्याच्या या प्रवासात मात्र पवार हा एक दुर्मिळ संयोग जुळून आल्याचे म्हणता येईल. आज कृषी दिवस हा कार्यालयाबरोबरच थेट शेतबांधापर्यंत सर्वत्र साजरा होतो. इतर राज्यात देखील 1 जुलैला कृषी दिन साजरा होतांना दिसून येते.

कृषीप्रधान भारत म्हणून ओळखले जाणाऱ्या देशात कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणून 1 जुलै कृषीदिनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कृषी दिवस हा नैसर्गिकरित्याच पेरणीच्या मुहूर्तावर आलेला एक पावनपर्व आहे. महानायक वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणली. याशिवाय पंचायत राज व रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार मानले जातात. ते पहिले शेतकरी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचा राजा म्हणून ओळखले जातात. भूमिहिनांना लाखो एकर जमीन त्यांनी वाटप केली. शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान आणि समृद्धी फुलवीण्याचे तसेच कृषीसंस्कृतीला नवसंजीवनी देण्याचे ऐतिहासिक कार्य महानायक वसंतराव नाईक यांनी केले. शिवाय पहिल्यांदाच चार कृषी विदयापीठाची स्थापना केली. 1972 सारख्या भिषण दुष्काळातही महानायक वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत कधी शेतकरी आत्महत्या हा शब्द देखील गवसला नव्हता. शेतकऱ्यांवर त्यांचे जिवापाड प्रेम होते. शेती आणि मातीवरील त्यांची निस्सीम भक्ती ही भारतीय कृषीसंस्कृतीच्या इतिहासात एक प्रेरणा म्हणून ओळखली जाते. "शेतकरी हा कारखानदार झालाच पाहिजे अन् शेतकऱ्यांचे लेकरं सुद्धा कलेक्टर झाली पाहिजेत." हे महानायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न होते. थेट बांधावर आधुनिक कृषीतंत्रे व दूरगामी उपाययोजनांची अमलबजावणी याबरोबरच नव्या पिढीत शेती, शेतकऱ्याप्रति जिव्हाळा निर्माण केल्यास नाईकसाहेबांचे स्वप्ने पुर्णत्वास येऊ शकते. भारतीय कृषीसंस्कृतीला उजाळा देणाऱ्या कृषी दिन या पावन पर्वाचे जनमाणसात अनन्यसाधारण असे महत्त्व असून शासकीय कार्यालय, गाव शहरात अनेक जयंती साजरी केली जाते. त्याचबरोबर थेट बांधावर-शेत शिवारातही मोठ्या प्रमाणात कृषी दिवस साजरा होत असल्याने या पर्वाला एक विशेष महत्व प्राप्त झाले आहे. शेती व शेतकऱ्यांवरील निर्व्याज प्रेम आणि कृतज्ञता म्हणून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर मोहीमेचे प्रवर्तक एकनाथराव पवार यांनी सन 2011पासून कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची अभिनव मोहीम सर्वप्रथम सुरु केली. आज ही संकल्पना एक प्रथा म्हणून नावारुपाला आली.

या दिवशी कृषीसंस्कृतीचे संस्मरण करून कृषीसंस्कृतीच्या समृद्धीसाठी संकल्प केल्या जाते. हा पर्व थेट बांधावर, शेत शिवारातही साजरा होत असून यात शेतकरी सन्मान, समुपदेशन, फळझाडांची लागवड व शेतकऱ्यांचे भाग्यविधाते महानायक वसंतराव नाईकांना आदरांजली अशा विविध स्वरुपात साजरा केला जातो. थेट शेत बांधावर शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी, शेतकऱ्यांना आत्महत्यापासून परावृत्त करून आत्मबळ मिळावे. आधुनिक शेती तंत्राचा जागर व्हावा, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी या उद्देशाने प्रसिद्ध विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिवस थेट बांधावर, शेत शिवारात साजरा करण्याची सर्वप्रथम मोहीम सुरु केली होती. या मोहीमेची दखल पुढे सामाजिक स्तरासोबतच इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने दखल घेतली. शिवाय पुढे सन 2019मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या काळात शासनस्तरावरही दखल घेण्यात आली. त्यामुळे कृषी दिन थेट शेत बांधावरही साजरा होत असल्याने या दिवसाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. कार्यालयात साजरा होणारा कृषी दिन हा आता थेट बांधावरही साजरा केला जात असून कृषीदिनानिमीत्त थेट बांधावर कृषी संजीवनी सप्ताह, वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र अभियान व शेतकरी कृतज्ञता सप्ताह सारखे स्तुत्य उपक्रम दरवर्षी राबविले जातात.


!! महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त समस्त शेतकरी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**


**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**श्रीगुरुदेव मंदिराजवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**




# शेतकऱ्यांचा जाणता राजा- वसंतरावजी नाईक



वसंतराव फुलसिंग नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी व राजनितीज्ञ होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान होते. नाईक यांचा जन्म पुसद जवळील गहुली या छोट्याशा खेड्यातील एका सधन शेतकरी कुटुंबात 1 जुलै 1913 रोजी झाला. वसंतराव नाईक हरितक्रांती , पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक मानले जातात. कृषीसंस्कृतीचा पुनर्रुत्थान करीत वसंतराव नाईकांनी देशभरात नावलौकिक मिळविला. आधुनिक भारतीय शेती आणि शेतकऱ्यांचा त्यांनी मान उंचाविला. 'आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत' या शब्दात प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत एकनाथराव पवार यांनी वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे. इ.स. 1972 मधील महाराष्ट्रातील भीषण दुष्काळादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी मदतीच्या दूरगामी योजना राबवल्या. महानायक वसंतराव नाईक यांना केवळ शेतकऱ्यांच्या प्रश्नांचीच जाणीव नव्हती तर, दूरगामी स्वरुपाच्या उपाययोजना सुद्धा त्यांनी केल्या. शेती आणि शेतकऱ्यांशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. कठीण काळातही क्रांतीकारी कार्य नाईकांनी केले. त्यामुळे त्यांना 'शेतकऱ्यांचा जाणता राजा', 'हरितयोद्धा' म्हणून संबोधतात. माजी राष्ट्रपती, भारतरत्न प्रणव मुखर्जी यांनी "वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहेत." या शब्दात नाईकांचा गौरव केला. महानायक वसंतराव नाईक हे एक नाव नसून शाश्वत विकासाची लोकाभिमुख विचारधारा आहे.



**डॉ बंजारा दिलीप लालू महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

# मनमानी करणाऱ्या आपले सरकार केंद्राची उपजिल्हाधिकारींकडून तपासणी

## नियमांपेक्षा ज्यादादर आकारल्यास आपले सरकार केंद्र चालकावर कठोर कारवाई करणार :उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे




अंबाजोगाई (प्रतिनिधी) सर्वसामान्य गोरगरीब लोकांना शासकीय सुविधांचा सुलभ लाभ घेता यावा म्हणून आपले सरकार पोर्टल द्वारे ऑनलाईन कामे केली जातात या कामासाठी शासनाने निर्धारित रक्कम केलेली आहे. मात्र आपले सरकार केंद्र चालक हे मनमानीपणे अव्वाच्या सव्वा पैसे घेऊन लूटमार करत असल्याच्या अनेक तक्रारी सोशल माध्यमातून झांबरे नामक महिला सामाजिक कार्यकर्त्यांनी समाज माध्यम व वरिष्ठांपर्यंत तक्रार केल्यामुळे उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी व महसूलच्या इतर अधिकाऱ्यांनी आपले सरकार केंद्रावर जाऊन पाच केंद्र चालकांची तपासणी करण्यात आल्यामुळे केंद्र चालकाचे धाबे दणाणले असून याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात येणार असून त्यावर काय कारवाई होते हे येणाऱ्या काही दिवसात समजेल.

याबाबत अधिक माहिती अशी प्रिया झांबरे, NP WOMEN AND CHILD SECURITY WELFARE FOUNDATION चंद्रपूर यांनी आपले सरकार सेवा केंद्राकडून अंबाजोगाई येथे जनतेची पिळवणूक होत असलेबाबत स्वत; सेवा केंद्रात जनतेकडून जादा पैशाची मागणी करण्यात येत असलेबाबत तसेच कार्यालयात खाजगी व्यक्ती कार्यरत असलेबाबत काही सेवा केंद्राचे व तहसिल कार्यालयात खाजगी कर्मचारी काम करत असलेबाबत व्हिडिओ चित्रीकरण करून ते सामाजिक प्रसार माध्यमावर प्रसारित केले होते व त्याबाबत शासनाकडे, मा. विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, मा. जिल्हाधिकारी यांचेकडे व अंबाजोगाईतील तहसिल कार्यालय व उपविभागीय कार्यालयाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुषंगाने आज मा. उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली अचानक तपासणी करण्यात आल्या त्यामध्ये 1. गॅलॅक्झी मल्टीसर्व्हीसेस, तहसिल कार्यालयाजवळ असलेले केंद्र मा. उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी तपासले त्यामध्ये त्यांचेकडे आपले सेवा केंद्र चालविण्याचा कोणताही परवाना दिसून आला नाही. 2. श्री अमित अरुण माळी यांचे आपले सरकार केंद्र श्री गायकवाड एम एल नायब तहसिलदार यांनी तपासले असता त्यांना सदरील कार्यालयाचा परवाना हा जोगाईवाडीचा असताना ते तहसिल समोरील रस्त्याकडून पाटील चौकाकडे जाणा-या रस्ता येथे दुस-या मजल्यावरुन सुरु असलेलेचे दिसून आले. 3. साई मल्टी सव्हीसेस व अनुराग जगताप यांची आपली सेवा केंद्र श्रीमती बाहेती स्मिता नायब तहसिलदार यांनी तपासणी केली असता त्रुटी दिसून आल्या आहेत. 4. आर्यन मल्टी सर्व्हीसेस यांचे आपले सरकार केंद्र तपासणीसाठी श्री जिडगे नायब तहसिलदार गेले असता त्यांना हे आपले सेवा केंद्र कुलुप लावल्याचे दिसून आले. मा. उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली आपले सरकार केंद्र तपासणी पहीलीच धडक कार्यवाही झाली. एकूण 05 आपले सरकार केंद्र तपासणी अचानकपणे तपासण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द परवाना नसताना आपले सरकार केंद्र चालविणे, जनतेकडून जादा पैसे घेणे, मनमानी कारभार करणे अशा अनेक तक्रारी होत्या. मा. उपविभागीय अधिकारी यांनी स्वत: अचानक तपासण्या केल्या आहेत. मागील अनेक वर्षामध्ये आपले सरकार केंद्रावर कोणीच कार्यवाही केली नसल्याने सदर अचानक तपासणीबाबत नागरिकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या आपले सरकार केंद्रावर काय कार्यवाही होणार याकडे अंबाजोगाई तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# गोरक्षनाथ विद्यालय, ढेकणमोहा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला





बीड / प्रतिनिधी गोरक्षनाथ विद्यालय, ढेकणमोहा या शाळेत दहावी, बारावी, नीट ,आणि एम पी एस सी, परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी दि. 30 जून 2025 रोजी एक खास सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. शिक्षणात मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारी ही शाळेची एक सुंदर परंपरा आहे. यंदाचा सत्कार सोहळा तर अगदी आत्मीयता, कौतुक आणि प्रेरणेचा संगम ठरला.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. उपस्थित सर्व मान्यवर, शिक्षक, पालक, आणि गावकरी यांच्यासमोर गुणवंत विद्यार्थ्यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आलं. डोळ्यांत आत्मविश्वास, चेहऱ्यावर समाधान आणि सभागृहात सतत टाळ्यांचा गजर एक वेगळीच ऊर्जात्मक अनुभूती या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे बडे सर होते. शाळेचे प्राचार्य डी. एस. मुंडे सर यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचं विशेष कौतुक करत म्हणाले शिक्षण म्हणजे केवळ परीक्षेत मिळणारे गुण नव्हे, तर संपूर्ण जीवन घडवण्याची तयारी. हे यश त्या वाटचालीचं सुरुवातीचं पाऊल आहे.यावेळी श्रद्धा रवींद्र डावकर हिने 12वीत 87.67% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या यशाने केवळ कुटुंबच नव्हे तर संपूर्ण शाळा आणि गावाचा अभिमान वाढवला. तर 10वीतून अथर्व डावकर याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.सूत्रसंचालनाची जबाबदारी शाळेचे प्राध्यापक डी. एच. मुंडे सर यांनी अतिशय नेमकेपणाने, प्रसंगानुरूप शैलीत निभावली. त्यांच्या बोलण्यातून विद्यार्थ्यांवरील प्रेम आणि शाळेबद्दलची निष्ठा स्पष्टपणे जाणवत होती. कार्यक्रमाच्या शेवटी ए. वाय. मुंडे सर यांनी उपस्थित सर्वांचं आभार मानत यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.हा सत्कार समारंभ केवळ विद्यार्थ्यांचा गौरव नव्हता, तर त्यांच्या मागे उभ्या असलेल्या शिक्षकांच्या मेहनतीचा, पालकांच्या विश्वासाचा आणि शाळेच्या संस्कारांचा उत्सव होता. गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शाळेच्या या उपक्रमाला भरभरून पाठिंबा दिला. गोरक्षनाथ विद्यालयानं आजवर सातत्याने गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान देत, त्यांच्या पाठीशी उभं राहत, शिक्षणात नवे आदर्श निर्माण केले आहेत. या सोहळ्यामुळे नव्या पिढीमध्ये शिकण्याची, पुढे जाण्याची प्रेरणा नक्कीच निर्माण होईल .व यातून विद्यार्थ्याला नक्कीच बळ मिळेल.

# नगरपरिषद कार्यालयासमोर सय्यद सलीमबापुंच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको

## » आंदोलकांनी विविध मागण्या लावून धरत मुख्याधिकाऱ्यांना आणले ताळ्यावर.




माजलगाव / प्रतिनिधी: शहरातील नागरी समस्या संदर्भात असणाऱ्या प्रश्नांसह विविध मागण्या लावून धरत आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने सय्यद सलीमबापू यांनी सोमवार दि.30 रोजी सकाळी नगरपरिषद कार्यालय समोर रास्ता रोको केला.यावेळी आंबेडकरी विचार मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या कामकाजाविषयी निषेधाच्या घोषणा करत मुख्याधिकाऱ्यांना ताळ्यावर आणले.

माजलगाव नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेले प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांचा मनमानी कारभार सुरु आहे. जनतेची अनेक कामे खोळंबली आहेत. परंतु पालिका प्रशासन गेंड्याची कातडी पांघरून आहे. या धोरणाविरुद्ध समाजसेवक व आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी एल्गार पुकारला. संघटनेच्या वतीने वतीने सोमवार दि.30 जुन 2025 रोजी नगर परिषदेसमोर रास्ता रोको केला.यावेळी कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या ढिसाळ कामाचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी केली. शहरातील नगरपरिषद हद्दीमध्ये किरायदार,भोगवटदार,बेघर या गोरगरीब लोकांना घरकुल देण्यात यावे. आलेले नाही. याला मंजुरी देण्यात यावी. आझाद नगर येथे अर्धवट रस्ता तयार करण्यात आलेला आहे,तो पूर्ण करण्यात यावा.सन 2020 ते 2025 या वर्षात नगरपरिषद माजलगाव यांनी किती गुंठेवारी केल्या याची यादी देण्यात यावी.किती लोकांना ओपनस्पेच्या बोगस पिटीआर देण्यात आल्या याची माहिती देण्यात यावी.शहरात किती ओपनस्पेस,डीपीरोड आहेत याची माहिती देण्यात यावी. इत्यादी मागण्या यावेळी कार्यकर्त्यांनी लावून धरल्या.सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी विचारु मोर्चाच्या वतीने केलेल्याभव्य रास्ता रोकोने धास्तावलेले पालिका प्रशासन ताळ्यावर आले.दरम्यान प्रशासनाच्या वतीने मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय घेण्याचे अभिवचन आंदोलकांना दिले.या आंदोलनात आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्षसय्यद सलीमबापू,एडवोकेट सय्यद अल्ताफ,यांच्यासह संघटनेचे शेकडो पदाधिकारी सहभागी होते.

## पान 1 वरुन

नयेत, यासाठी त्यांचेवर तात्काळ कडक कार्यवाही करावी अशा सूचना ना. पंकजाताई मुंडेंनी केल्या आहेत. यासंदर्भात आणखी पालकांच्या तक्रारी असल्यास त्यांना शासनाची संपूर्ण सुरक्षा दिली जाईल, त्यांनी यासाठी पुढे यावे असे आवाहनही ना. पंकजाताईंनी केले आहे.

-----------------------------------

विकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ हया देखील होत्या. दरम्यान, सकाळी रामटेक निवासस्थान येथे त्यांनी ईव्ही कारची विधीवत पूजा केली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी यावेळी त्यांना 'महिंद्रा एक्सईव्ही नाईन-ई' या मॉडेलची चावी सुपूर्द केली.

विधानभवनात आल्यानंतर यासंदर्भात माध्यमांशी संवाद साधताना ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, पर्यावरण मंत्री या नात्याने प्रदुषण कमी व्हावे यासाठी इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास करत प्रतिकात्मक संदेश देत आहे.या वाहनाने दूरचा प्रवास करणे मला थोडे कठीण जाईल पण मुंबईत तरी ते शक्य होईल, त्यामुळे इव्ही कार वापरण्याचे मी ठरवले. अनेकांना माझं हेच आवाहन असेल की त्यांनी अशा वाहनांचा वापर करावा जेणेकरुन वातावरणातील प्रदुषण कमी होण्यास फार मोठी मदत होईल.

---------------------------------------

करणे ही प्राथमिकता होती, मात्र आरोपी, त्यांचे नातेवाईक, मदत करणारे यांचे सीडीआर, आयपीडीआर, व्हॉटसअप चॅट, इन्स्टा, चॅट, प्रायव्हेट कॉलिंग, मोबाईल डेटा मधील व्हिडिओ, फोटो, व्हॉटसअप कॉल, फेस टाईम कॉल यांपैकी पोलिसांनी अद्याप काहीही ताब्यात घेतले नसल्याची माहिती आहे, तसेच संकुलात असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये 13 जून पूर्वीचे फुटेज उपलब्ध नाही, अशा अनेक त्रुटी पोलीस तपासात दिसून येत असल्याचा उल्लेखही धनंजय मुंडे यांनी केला आहे.

या प्रकरणातील पीडिता व तिच्या कुटुंबीयांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निकटवर्तीयकडून धमकावले जात असून तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणला जात आहे, अशाच प्रकारच्या दबावामुळे इतर पीडित मुली समोर येऊन तक्रार द्यायला धजावत नाहीत, असेही मुंडेंनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

दरम्यान संबंधित आरोपींपैकी विजय पवार यांच्याकडे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता असून, ते स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सोबत अनेक व्यवहार एकत्र करतात, बेनामी जमिनी, प्लॉट, रेड झोन मध्ये खाजगी शाळेचे बांधकाम असे अनेक काळे कारनामे यांनी संगनमताने केले असून याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

दरम्यान पवार व त्याच्या गँग ने कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयांची फी वसुली केलेली आहे. तसेच वेळेत फी भरु न शकलेल्या गरीब कुटुंबातील मुलींना टार्गेट केले आहे. क्लासेस च्या नावाखाली केली जाणारी ही आर्थिक लूट थांबावी, यासाठी बीडच नव्हे तर सबंध राज्यातील कोचिंग क्लासेस चालकांना फी मर्यादा, वसुली, विद्यार्थ्यांची सुरक्षा यांसारख्या कायदेशीर व नैतिक संहिता लागू करण्यासाठी एक धोरण निश्चित केले जाऊन तशी नियमावली निर्गमित केली जावी, अशी मागणी देखील धनंजय मुंडे यांनी केली असून, अशी मागणी करणारे धनंजय मुंडे हे पहिलेच लोकप्रतिनिधी ठरले आहेत!

दरम्यान धनंजय मुंडे यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी दिले आहे.

-----------------------------------------------------

स्वागत प्रमुख सुखदेवजी चव्हाण आणि संतोषजी राठोड तसेच समस्त राठोड परिवार यांनी केले आहे.

--------------------------------------

आहेत. विशेष म्हणजे या मेळाव्याचे आता ठिकाणही ठरले आहे. जिथं शिवसेनाप्रमुख तथा दिवंगत नेते बाळासाहेब ठाकरे यांचे पहिले भाषण झाले होते, त्याच ठिकाणी आता राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार आहेत.मिळालेल्या माहितीनुसार राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मुंबईत होणाऱ्या विजयी मेळाव्याचे ठिकाण ठरलेले आहे. येत्या 5 जुलै रोजी हा विजयी मेळावा होणार आहे. मुंबईतील दादरमध्ये असलेल्या शिवाजी पार्कात हा ऐतिहासिक मेळावा होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे याच ठिकाणी शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर 19 जून 1966 रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी पहिले भाषण केले होते. शिवसेनाप्रमुख म्हणून त्यांनी याच जागेवरून संपूर्ण शिवसैनिक तसेच महाराष्ट्राला संबोधित केले होते. त्यांच्या या भाषणानंतर शिवसेनेची वेल विस्तारतच राहिली. आता याच ठिकाणी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येऊन भाषण करणार आहेत.राज्य सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय रद्द करावा म्हणून ठाकरे गट आणि मनसेने संयुक्तपणे 5 जुलै रोजी मोर्चा काढण्याचं ठरवलं होतं. पण त्याआधीच सरकारने हिंदी सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्द करून या मोर्चामधील हवा काढून घेण्याचा प्रयत्न केला. पण आमचं उद्दीष्ट साध्य झालं असलं तरी शिवसैनिक तसेच मराठी भाषाप्रेमी येत्या 5 जुलै रोजी जमणार आहेत. हा हिंदी सक्तीविरोधातील मोर्चा नसेल पण हा विजयी वेळावा असेल असे उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले होते. तसेच त्यांनी यात मनसेनेही सहभागी व्हावे, असे आवाहन केले होते.

------------------------------------------

बुट व मोबाईल पण मोदींनीच दिला अशा प्रकारची मग्रुरीची भाषा त्यांनी वापरली. लोणीकर हे राज्यातील जनतेला लाचार समजत आहेत. त्यांची ही भाषा लोकशाहीत बरोबर नाही. उलट त्यांची आमदार की त्यांची गाडी, गाडीतील डिझेल त्यांचा इतर खर्च हा सर्वसामान्य जनतेचा पैशातुनच आहे. लोणीकरांचे वक्तव्य हे जनतेचा अपमान आहे या करिता त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली असून

दरम्यान बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्या बद्दल वापरलेल्या अप शब्दाचा निषेध म्हणून मोंढा मार्केट येथील विजयस्तंभा समोर बबनराव लोणीकर यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले तर तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले.

यावेळी प्रदेश चिटणीस अँड.अनिल मुंडे, माजी शहराध्यक्ष प्रकाशराव देशमुख,शशी चौधरी , इतेशाम खतिब,वैजनाथ गडेकर,सुभाष देशमुख,रसुल खान,दिपक सिरसाट, बद्दरभाई,फरकुंद अली बेग,बाबासाहेब गिते,बाबा शेख अदी काँग्रेस पदाधिकारी सहभागी होते.

## पान 4 वरुन

कार्यक्रमात कु. सिद्धी हिचा भव्य सत्कार करण्यात आला.कार्यक्रमांस संस्थेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे, प्राचार्य मंगेश काशिद सर, डॉ. अनंत टिंबे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपास्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यावेळी कु. सिद्धी टिंबे हिने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, या यशामागे माझं कष्ट तर आहेतच, पण त्याहूनही मोठं योगदान आहे ते माझे गुरु प्रा. कैलास घुगे सरांचं. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय हे शक्यच नव्हतं. असे मनोगत तिने यावेळी व्यक्त केले.

घुगे सर विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण करत असतानाच, त्यांच्या मानसिक ताकदीकडेही तितकंच लक्ष देतात. "तू करु शकतेस" या एका वाक्यानं अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात नवं उजाडलंय सिद्धी हे त्याचं जिवंत उदाहरण असल्याचेही तिने यावेळी सांगितले.

--------------------------------------------

आहे. त्याचबरोबर सर्व वर्गांना सेमी इंग्रजीचे माध्यमाचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे."कार्यक्रमाचे संचालन शाळेचे इन्चार्ज जब्बार सरांनी केले. कार्यक्रमास पालक तसेच परिसरातील शिक्षण प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात तैमुर मौलाना,मुफ्ती अमीर साहाब,जनाब शरीफ भाई, हाजी राजा खान साहब, हाजी बाबा, साजिद भाई,मोहम्मद रफीक सर, खालील सर, बशीर सर,साबिर सर,शाहेद साहब,रहीम भाई, नाजर भाई, रसूल खान, विनोद भाई, वाजेद भाई इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. उपस्थितांचे आभार व्यक्त माणून रेफ्रेशमेंट नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

-------------------------------------------------

आला. जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के पाटील, पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या मार्गदर्शनाने अनेक उपक्रम राबवण्यात आले. सकाळी 11 वाजता उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर 12 वाजता विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरुण गुट्टे, पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, अॅड.सतीश देशमुख, डॉ.संदीपान काळे, नितीन शिंदे, मुक्ताराम गवळी, रमेशराव ढाकणे, पांगरीचे राजेभाऊ फड, रामभाऊ राडकर, वर्षाताई रायभोळे, दिपाली सावंत, मंगलताई सोळंके, फिरोज सय्यद, रामचंद्र देवकते, रेखाताई जानराव, अश्विनीताई सरवदे, समाधान मुंडे, सनी मस्के, डॉ.बोरा, गोपाळ सलगर, हनुमंत फड, प्रल्हाद गित्ते, इमरोज खान, शेख फिरोज, प्रद्युम्न मुंडे यांच्यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

-------------------------------------------

या प्रकारामुळे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि परिसरातील रहिवासीही चिंतेत असून, महावितरणच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.शाळेच्या आसपासचा परिसर तातडीने स्वच्छ करून, डीपी सुरक्षित करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनीही केली आहे.

-----------------------------------------

असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले आहे.

त्यांनी आरोपींविरुद्ध कठोर कारवाई आणि जलद न्यायप्रक्रिया सुरु करणे, पीडित विद्यार्थिनीला मानसिक, कायदेशीर आणि सामाजिक आधार देणे, बीड जिल्ह्यातील तसेच इतर खासगी कोचिंग क्लासेसची सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करणे, तसेच अशा संस्थांमध्ये ठोस आचारसंहिता व प्रतिबंधात्मक उपायांची प्रभावी अंमलबजावणी करणे या बाबींवर तातडीने कार्यवाही करण्याचा आग्रह धरला आहे.

"या प्रकरणाकडे 'शून्य सहनशीलता'च्या दृष्टिकोनातून पाहून तत्काळ कारवाई व्हावी, अशी जनतेचीही अपेक्षा आहे. महिला सुरक्षेच्या दृष्टीने शासन आणि पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत," असे स्पष्ट मत उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

----------------------------------------------

दहिफळे यांनी तसेच कार्यालयासमोर स्वतःच्या अंगावर पेट्रोल टाकून घेतले आणि काड्याचे डबे काढून आग लावून घेणार तोच पोलिसांनी तात्काळ धाव घेतली आणि दहिफळे यांना ताब्यात घेतली यामुळे यांचा जीव वाचला परंतु प्रश्न आहे ज्या मागणीसाठी दहिफळे यांनी स्वतःचा जीव पणाला लावला आहे तो प्रश्न आता तरी सुटणार आहे का.

--------------------------------------------

अभिवादन करण्यात आले .तर बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना सर्वपक्षीय सामुदायिक अभिवादन करण्यात आले.

लोकनेते विनायकराव मेटे हे फक्त जिल्ह्याचे नेते नसून त्यांनी उभ्या महाराष्ट्र भर आपल्या सामाजिक कार्यातून दीनदलित, उपेक्षित, वंचित यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांच्या कार्याची गणना करणे अशक्य आहे. सामूहिक विवाह सोहळ्यातून त्यांनी अनेकांची संसार थाटले , कोविड काळात सर्वसामान्यांना मदतीचा हात दिला, दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पने उभा राहिले, व्यसमुक्तीसाठी लढा उभा केला , युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले. लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपली उभी हयात समाजासाठी अर्पण करत समाजाच्या लढ्यासाठी घालवली. मराठा , मुस्लिम , धनगर आरक्षण मिळावे या मागणीसाठी त्यांनी जीवाची पराकाष्ठा केली आपण "शेवटच्या श्वासापर्यंत मराठा आरक्षण लढा चालू ठेवणार" अशी भीष्म प्रतिज्ञा त्यांनी केली होती आणि त्यांचा शेवटही मराठा आरक्षणावर होवू घातलेल्या मुंबई येथील बैठीकाला जाताना झाला. या लढवय्या नेत्याच्या जाण्याने समजा पोरका झाला आहे. अशा बहु आयामी लोकनेत्याला समाज कधीच विसरणार नाही. अशी भावना उपस्थित व्यक्त करत होते. यावेळी अनेकांना आपल्या भावना अनावर झाल्या अत्यंत जड अंतःकरणाने उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, अशोक हिंगे, दिलीप गोरे, नारायणराव काशिद, प्रा. सुभाष जाधव, राजेंद्र मस्के, उल्हास गिरम,CA बी.बी.जाधव, अनिल घुमरे, रमेश चव्हाण, डॉ.प्रमोद शिंदे, राजाभाऊ मोहाले, नारायणराव थोरात, निवृत्ती डोके, तुळशीराम पवार, उत्तम पवार, ज्ञानेश्वर चौधरी, पंडित माने, प्रमोद कुलकर्णी महेश वाघमारे, संजय पवार, गोरख शिंदे, राजेश भुसारी, भास्कर गायकवाड, उदय जोगदंड, सुनील शिंदे ,बाळासाहेब खोसे,नवनाथ प्रभाळे, बाबासाहेब पाटील, लिंबराज वाघ, दोडके फैजी आदी सह शिवसंग्रामचे कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अशोक हिंगे, संजय पवार, अतुल लंगोरे आणि सुशील कांबळे यांनी रक्तदान करून शिबिराची सुरवात केली. या शिबिरात एकूण 62 रक्तदात्यांनी रक्तदान करून मेटे साहेबांना श्रद्धांजली अर्पण केली.

------------------------------------------

, अनुराग , आदित्य , एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.

आज सोमवार, दिनांक 30 जून रोजी त्यांच्यावर वीरशैव लिंगायत स्मशानभूमी, परळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीस समाजातील अनेक मान्यवर, नातेवाईक, आणि हितचिंतक उपस्थित होते. स्वामी कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक .... परिवार सहभागी आहे.

---------------------------------------------

ठाण्यात नोंद करण्यात आली आहे या घटनेचा पुढील तपास ए.एस.आय बाळकृष्ण मुंडे करत आहेत या दुर्दैवी घटनेमुळे घाटनांदुर व परिसरातील नागरिकांतून हळहळ व्यक्त होत आहे.

--------------------------------------------

वडीलधारी मंडळी, महिलावर्ग, शिक्षक आणि तरुण मित्रपरिवार उपस्थित होता. या कार्यक्रमाचं आयोजन विद्यमान सरपंच किशोर फुलसरे यांनी केलं होतं.

---------------------------------------------

उपलब्ध करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे,

विद्यार्थ्यांना अनुभवावर आधारित शिक्षण देणे, ज्यामुळे त्यांचे ज्ञान आणि कौशल्ये वाढतील. या

योजनेत सर्व स्तरांतील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रामध्ये, या योजनेत 846 शाळांची निवड करण्यात आली आहे, ज्यापैकी 516 शाळांना पहिल्या टप्प्यात मंजुरी मिळाली आहे. या पहिल्या टप्प्यात तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेची निवड करण्यात आली आहे. या योजनेचा निधी टप्प्या टप्प्यात येत आहे. मात्र गाढे पिंपळगाव येथील शाळेत आलेल्या निधीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असून ज्यासाठी निधी खर्च करावयाचा आहे तो मुख्याध्यापकांनी खर्च न करता तो खर्च न करता काढून घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार मुख्याध्यापकांनी लाखोंचा निधी स्वतःच्या वैयक्तिक खात्यात वर्ग केला आहे. त्यामुळे या निधीची व करण्यात आलेल्या कामाची चौकशी करण्याची मागणी माजी सरपंच शरद राडकर यांनी गटशिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्रीरंग राडकर यांनी सांगितले की, मुख्याध्यापक शाळा व्यवस्थापन समितीस काहीही न विचारता परस्पर सर्व व्यवहार करत आहेत. त्यांच्या या व्यवहाराची चौकशी करण्यासाठी गटविकास अधिकारी यांना यासंदर्भात निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

----------------------------------------

हॅलो बीड
# संघर्षनेता
मंगळवार दि. 01 जुलै 2025


## नीट 2025 मध्ये घवघवीत यश कु. सिद्धी टिंबे हिचा माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये सन्मान

### प्रा. कैलास घुगे सर एक शिक्षक नव्हे, तर शिल्पकार- कु. सिद्धी टिंबे






परळी / प्रतिनिधी प्रा. कैलास घुगे सर हे केवळ शिक्षक नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे शिल्पकार आहेत. त्यांच्या शिकवणीत फक्त अभ्यासक्रम नव्हे, तर जिद्द, आत्मविश्वास, आणि संघर्षातून यश गाठण्याची कला असते.असे मत नीट 2025 परीक्षेत 557 गुण मिळवत यश मिळविलेल्या कु सिद्धी अनंत टिंबे हिने लोकराजा छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त माऊंट लिटेरा झी स्कूलच्या वतीने आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये लोकराजा राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित पान 3 वर

### पालकांचं कृतज्ञ मनोगत

या प्रसंगी सिद्धीचे पालक डॉ. अनंत टिंबे यांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू होते. आमच्या मुलीला योग्य दिशेने घडवलं, तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवला आणि तिच्यातील सर्वोत्तम आणून दिलं यासाठी आम्ही घुगे सरांचे सदैव ऋणी आहोत,असे भावूक उद्गार त्यांनी काढले.

### विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश

सिद्धीने आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना अत्यंत प्रेरणादायी संदेश दिला. स्वप्न मोठं असावं, मेहनत प्रामाणिक असावी आणि मार्गदर्शन योग्य व्यक्तीकडून मिळालं, की यशाचे शिखर गाठता येते. तिच्या या शब्दांनी उपस्थित सर्वांची मने जिंकली.

### सत्कार सोहळा स्मरणीय ठरला

या कार्यक्रमात कु.सिद्धीचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि टाळ्यांच्या कडकडाटात सत्कार करण्यात आला. तिच्या यशकथेने विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण केला. एक गुरु शिष्याला केवळ यश मिळवून देत नाही, तर त्याला आयुष्यभरासाठी मार्ग दाखवतो.




## मलिकपुरा येथील 'इमदादुल उलूम' प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन संपन्न

मराठवाडा साथी
PCN NEWS
एक पाऊल प्रगतीकडे...





परळी वैजनाथ: (वार्ताहार) आज दिनांक 30 जून 2025 रोजी महेबूबिया शिक्षण संस्था संचलित परळी येथील मलिकपुरा भागातील प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे भव्य उद्घाटन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या शुभहस्ते झाले.

या उद्घाटन सोहळ्यास संस्थेचे पदाधिकारी सदस्य जनाब हाजी अमजद अली जागीरदार साहेब, अध्यक्ष शेख खाजा शेख मेहेताब व सचिव सय्यद हनिफ सय्यद करीम इत्यादी पदाधिकारी तसेच ममलिकपुरा भागातील प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका साहेबांनी केले. प्रास्ताविक भाषणात त्या म्हणल्या की या नवीन इमारतीत विद्यार्थ्यांना प्रशस्त वर्ग खोल्या, संगणक कक्ष, लायब्ररी, खेळाचे मैदान इत्यादी अद्यावत भौतिक सुविधा पलब्ध करुन देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही नवीन इमारत उपयुक्त ठरणार आहे. यानंतर संस्थेचे सचिव सय्यद हनीफ सय्यद करीम साहेबांनी सांगितले की मलिक पुरा भागातील उर्दू माध्यमात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या पालकांनी आपल्या पाल्यांचा लवकर प्रवेश निश्चित करून घ्यावा. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी संस्था सर्वस्तरावर सहकार्य करेल.शाळेत पुर्वप्राथमिक (युकेजी, एलकेजी) पासून ते इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण दिले जात पान 3 वर

## खा.सुप्रीताई सुळे यांचा जन्मदिन सामाजिक उपक्रमाने साजरा

### ➲ परळी उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळांचे वाटप; अनेक ठिकाणी वृक्षारोपण





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) लोकसभेतील संसदरत्न खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सौ.सुप्रियाताई सुळे यांचा सोमवारी जन्मदिवस असल्याने परळी वैजनाथ येथे अनेक सामाजिक उपक्रम घेण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

परळी वैजनाथ येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा, संसदरत्न खासदार सौ.सुप्रियाताई सुळे यांचा जन्मदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात पान 3 वर

## विवेकवर्धिनी शाळेच्या डीपीभोवती झाडांचा विळखा हा विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ– ॲड मनोज संकाये यांची महावितरणकडे तातडीने कारवाईची मागणी




परळी वैजनाथ / प्रतिनिधी शहरातील शारदा नगर येथील विवेकवर्धिनी शाळेच्या भिंतीलगत असलेल्या महावितरणच्या डीपीला झाडे व वेलीने पूर्णपणे विळखा घातला असून, सध्या सुरु असलेल्या पावसाळ्यात वाऱ्यामुळे विद्युत तारांमध्ये शॉर्टसर्किट होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी दररोज शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या ठिकाणी संभाव्य अपघाताची शक्यता लक्षात घेता सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी तातडीने महावितरण विभागाने लक्ष घालून वेली, झुडपे व झाडे हटवून डीपी पूर्णपणे मोकळी करावी, अशी तीव्र मागणी केली आहे. सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी यावेळी बोलताना सांगितले की, शाळेच्या डीपीभोवती वाढलेली झाडं व वेली ही विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करण्यासारखी परिस्थिती आहे. महावितरणने तत्काळ झाडे हटवून सुरक्षितता सुनिश्चित करावी, अन्यथा अपघातास त्यांचीच जबाबदारी राहील," असे संकाये यांनी स्पष्टपणे सांगितले. पान 3 वर

## "बीड येथे विद्यार्थिनीवरील लैंगिक छळप्रकरणी कठोर कारवाई करा"

### विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची विशेष मागणी



बीड, 30 जून 2025 : बीड येथील एका खासगी कोचिंग क्लासमध्ये विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक छळाच्या धक्कादायक घटनेची गंभीर दखल घेत विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांना पत्र पाठवून तत्काळ आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणाला संतापजनक आणि समाजाला हादरवून टाकणारे म्हटले असून, अल्पवयीन विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत हे गंभीर प्रश्न उपस्थित करणारे असल्याचे स्पष्ट केले आहे. शिक्षणाच्या उद्देशाने कोचिंग क्लासमध्ये गेलेल्या मुलीवर असे अत्याचार होणे हे कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी लज्जास्पद असून, अशा घटकांना वेळीच थांबवणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या.

या प्रकरणात संबंधित विद्यार्थिनीने धैर्याने पुढे येत पोलिसांकडे तक्रार दिली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तसेच, अशा प्रकरणांमध्ये त्वरित न्यायप्रक्रिया आणि कठोर कायदेशीर कारवाई आवश्यक पान 3 वर

## आम्ही शेती करतो म्हणून तुम्ही बसून खाता आत्मदहन करणा-या शेतकऱ्याचा आक्रोश

### 2019 पासून शेतकरी मागतोय शेताला वाट





परळी प्रतिनिधी. तो प्रशासनाच्या दिरंगाईला आणि काम न करण्याला वैतागून गेला.तो तहसील कार्यालयासमोर आला. अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहन करु लागला तोच पोलिस धावले आणि त्याला पकडले.परंतू शेतकरी मात्र शासन व प्रशासन यांच्या विरोधात आरडाओरडा करत होता. आम्ही शेती करतो म्हणून तुम्ही बसून खाता हे सांगत होता आणि तुम्ही शेतकऱ्यांला हाकलून देता असा आक्रोश करीत होता.

यावेळी पोलीस व उपस्थित पत्रकारांना बोलताना सिरसाळा येथील शेतकरी ज्ञानेश्वर दहिफळे संतापून सांगत होता.मी 2019 पासून माझ्या शेतजमीनीला शेतरस्ता काढून द्यावा.पण तहसील प्रशासन माझं ऐकत नाहीत.तहसीलदा र मला हाकलून देत आहेत. म्हणून नाईलाजाने मी आठ दिवसांपूर्वी आत्मदहनाचा इशारा दिला होता.

दरम्यान आज दिनांक 30 जून रोजी दुपारी बारा वाजता ज्ञानेश्वर पान 3 वर

## लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यास जनसागर लोटला!



बीड / प्रतिनिधी लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती दि. 30 जून सोमवार रोजी त्यांच्या आठवणींना उजाळा देत साजरी करण्यात आली. सकाळपासूनच अभिवादनासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी 11 वाजता सामुदायिक अभिवादन कार्यक्रम बीड येथील लोकनेते विनायकराव मेटे स्मृतीस्थळी पार पडला यावेळी सामाजिक ,राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह , शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मेटे साहेबांवर प्रेम करणारे असंख्य चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त त्यांचे स्मरण व्हावे यासाठीआज सकाळपासूनच गावो - गावी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते वस्ती , वार्ड, तांड्यावर त्यांना अभिवादन करत जयंती साजरी करण्यात आली. गावातील ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक सभागृह, वाचनालय या ठिकाणी नागरिकांच्या वतीने त्यांना पान 3 वर



नाभिक समाजाच्या हक्कांसाठी दिवस-रात्र परिश्रम करणारे, समाजसेवेला आयुष्य समर्पित करणारे आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरलेले श्रीनिवास बबनराव राऊत यांची 'महाराष्ट्र नाभिक महामंडळ' परळी तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करतांना भिवा बिडगर, गोविंद सोनवणे, व्यकटराव हरणावळ

## कांताबाई भीमाशंकर स्वामी (मठपती) यांचे दु:खद निधन



परळी वैजनाथ / प्रतिनिधी जंगम गल्ली, परळी वैजनाथ येथील रहिवासी व समाजसेविका श्रीमती कांताबाई भीमाशंकर स्वामी (मठपती) यांचे रविवार, दिनांक 29 जून 2025 रोजी रात्री 9.30 वाजता दुःखद निधन झाले. निधन समयी त्या 71 वर्षांच्या होत्या.

कांताबाई स्वामी (मठपती) या अत्यंत मनमिळावू, सुस्वभावी आणि सामाजिक कार्यात सक्रिय व्य क्ति म त्व म्हणून परळीत सर्वपरिचित होत्या. वीरशैव लिंगायत समाजाच्या धार्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग होता.

त्यांच्या पश्चात एक मुलगा धनंजय स्वामी (मठपती), नातु गणेश पान 3 वर

## घाटनांदुर येथे 11 वर्षीय मुलीचा विहिरीत बुडून मृत्यू

घाटनांदुर प्रतिनिधी :- अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथील (महादेव पट्टी) जवळ झोपडीत राहणाऱ्या रेणुका राजू गुंजाळकर (वय 11) रा सावरगावमुंडे ता लोणार जि बुलढाणा येथील असून रेणुका तिच्या आत्याकडे घाटनांदुर या ठिकाणी राहत होती रेणुकाची आत्या पोटाची खळगी भरण्यासाठी घाटनांदुर येथे दगड फोडून मजुरी करत होती रेणुका 30 जून रोजी सोमवारी सकाळी 12च्या सुमारास विहिरीत पाणी आणण्यासाठी गेली असता विहिरीत पाय घसरुन बुडाल्याने नातेवाईकांनी आरडा-ओरडा केला असता नातेवाईकांनी विहिरीतून काढून अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात नेले असता रेणुकास डॉक्टरांनी मृत घोषित केले या मृत्यूची अंबाजोगाई ग्रामीण पोलीस पान 3 वर

## भाटवडगावात शाळकरी मुलींना सायकल वाटप

### माजी सरपंच गीताराम अनभुले यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



म ा ज ल ग ा व / प्रतिनिधी :- समाजासाठी काहीतरी चांगलं करून वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श भाटवडगावात पाहायला मिळाला. येथील माजी सरपंच गीतारामजी आबा अनभुले यांनी आपल्या 43 व्या वाढदिवसानिमित्त एक आगळावेगळा उपक्रम राबवून गावकऱ्यांचे मन जिंकले.

गावातील शाळकरी मुलींना सायकल वाटप करून त्यांचा शिक्षणप्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित व्हावा, यासाठी या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं. गावापासून शाळेचं अंतर सुमारे 1 किलोमीटर असून, मुलींना दररोज शाळेत जाण्यासाठी पायी चालावं लागतं. ही अडचण लक्षात घेऊन, सामाजिक जाणिवेतून प्रेरित होऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला. या सायकल वाटप कार्यक्रमात गावातील पान 3 वर

## गाढे पिंपळगाव जिल्हा परिषद शाळेत पीएमश्री योजनेत भष्टाचार, निधीच्या खर्चाची चौकशी करावी-माजी सरपंच शरद राडकर



परळी वैजनाथ दि.30 (प्रतिनिधी) गाढे पिंपळगाव जिल्हा परिषद केंद्रीय शाळेची केंद्र सरकारच्या पीएमश्री योजनेत निवड करण्यात आली असून या योजनेच्या आलेल्या निधीत मोठ्या प्रमाणावर भष्टाचार झाला आहे याची चौकशी करण्याची मागणी माजी सरपंच शरद राडकर यांनी केली आहे.

केंद्र सरकारच्या वतीने संपूर्ण देशातील निवडक शाळांचा सर्वांगीण विकास करून त्यांना उत्कृष्ट शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज करण्यात येणार आहे. या योजनेत, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020 च्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करून या शाळा आदर्श शाळा म्हणून उदयास येतील, असे शिक्षण मंत्रालयाने या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात म्हटले आहे. पीएमश्री योजनेची मुख्य उद्दीष्ट्ये म्हणजे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण देणे,शाळांमध्ये उत्तम सुविधा पान 3 वर